# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

(दुरध्वनी:०२३१-२५२१०३८) विद्यानगर कोल्हापूर (फॅक्स: ०२३१-२५२१०१६)

ई-मेल: gpkolhapur@yahoo.com **परीक्षा विभाग** संकेत स्थळ www.gpkolhapur.org.in


जा.क्र.शातंनिको/पवि/२०१९/७१९ दि. ०१.०७.२०१९

# विद्यार्थ्यांना सुचना

विषय :- विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणेबाबत... (R , R+RR)

सर्व नियमित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषम सत्राच्या विषयाची नोंदणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Date | Programme (Both Shifts) |
|---|---|
| 02/07/2019 To 10/07/2019 | All Programme |

नियमित (R)विद्यार्थ्यांसाठी रु.४२५ ऐवजी ६०० रुपये (स.परीक्षा-५०० चा.परीक्षा-१००)

नियमित (R + 3RR) विद्यार्थ्यांसाठी रु.७२५ ऐवजी ९०० रुपये (स.परीक्षा-८०० चा.परीक्षा-१००)

नियमित (R + more than 3RR) विद्यार्थ्यांसाठी रु.७२५ ऐवजी ११०० रुपये (स.परीक्षा-~~९००~~ १००० चा.परीक्षा-१००)

१) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या सांकेतीक स्थळावर (www.gpkolhapur.org.in) त्यांचे माहिति पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो,ई-मेल अॅड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपुर्वक भरावी. प्रत्येक विद्यार्थ्यांने स्वतःचाच मोबाइल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करु शकतील. खाजगी नेट कॅफे चालकाचा ई-मेल आयडी असल्यास तो त्वरीत वदलुन स्वतःचा ई-मेल आयडी नोंदवावा. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देणेत येतील.

२) आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी. पासवर्ड विसरलेस रु.५०/- इतके शुल्क भरुन पासवर्ड घेता येईल.

३) सर्व विद्यार्थ्यांनी सत्र २०१९ विषय नोंदणी/पुन:नोंदणी संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी यांच्याशी संपर्क साधुन योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा. Detain झालेल्या विषयांची नोंदणी पुन्हा R म्हणून करुन विद्यार्थ्याने त्याचे सत्र कर्म पुर्ण करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

४) एकदा विषय नोंदणी /परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन Save केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडुन बदल करुन घ्यावा व तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५) गुण पडताळणी/फोटोकॉपी साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधीत निकालाच्या अधिन राहुन विभागातील विषय नोंदणी अधिकारी/वर्ग-शिक्षक/विभाग प्रमुख यांचेकडे तदानुषंगिक आशयाचा (विषय नोंदणी/पुन:नोंदणी बदल,विषयाच्या थेअरी/प्रॅक्टिकलचे क्लास अटेंड करणे ई.) अर्ज करुन पुर्व परवानगी घेऊन ठेवावी. जेणेकरुन संभाव्य शैक्षणिक व आर्थिक नुकसान (लेट फी) टाळता येईल.

६) गुण पडताळणी/ फोटोकॉपीचा निकाल जाहीर झालेनंतर त्यानुसार परीक्षा विभागात अर्ज करुन मुळ गुण पत्रिका जमा करावी व सुधारीत गुण पत्रिका, विषय नोंदणी/विषय पुन:नोंदणीमध्ये आवश्यक तो बदल परीक्षा विभागामार्फत करुन घ्यावा. तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

७) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरलेनंतर विषयनोंदणी/परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पध्दतीने आकारणेसाठी विद्यार्थी विभागाशी संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (confirm ) जमा करावे. <u>विषय नोंदणी अधिकारी दि.०५/०७/२०१९ ते १५/०७/२०१९ या कालावधीत अर्ज कायम (confirm ) करतील.</u>

विषय नोंदणी अधिकाऱ्यांनी अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापुर

प्रत:-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३.सर्व विभागाना जाहीर करणेसाठी